# ऋणनिर्देश

"१९ व्या शतकातील स्त्री हक्काची मांडणी : 'स्त्री पुरुष तुलना' व 'स्त्रीधर्मनीति' यांच्या विशेष संदर्भात" हा शोधप्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल्. (राज्यशास्त्र) पदवीसाठी सादर करताना मला आनंद होत आहे. यासाठी ज्यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले त्या सर्वांचे ऋण व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजते.

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या संशोधनासाठी मार्गदर्शिका, म्हणून मला आदरणीय मातृतुल्य डॉ. भारती पाटील मॅडम यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. विविध जबाबदाऱ्या पार पाडत दैनंदिन व्यस्ततेतून वेळ काढून त्यांनी मला सतत मार्गदर्शन केले हे मी कधीच विसरू शकणार नाही. हा शोधप्रबंध अधिकाधिक अर्थपूर्ण व नेमका होण्यासाठी त्यांनी महत्त्वाच्या सुचना केल्या त्या मला अभ्यासात अधिक महत्त्वाच्या ठरल्या त्याबद्दल मी त्यांची शतश: ऋणी आहे.

राज्यशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. अशोक चौसाळकर सर, विभाग प्रमुख डॉ. वासंती रासम मॅडम, पांडुरंग भोये सर यांनीही मला मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

माझे आजी–आजोबा, आई–वडील यांच्या प्रेरणेतूनच हे कार्य करू शकले. माझे बंधू सुभाष व दिपक आणि वहिनी यांच्याकडून मला प्रेरणा व सहकार्य लाभले. याबरोबरच माझ्या मित्रपरिवाराचेही मला मोठे सहाय्य मिळाले. त्याबद्दल त्यांचे आभार.

तसेच हा शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी ज्यांची प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष मदत झाली त्या सर्व ज्ञात–अज्ञातांची मी मन:पूर्वक आभारी व ऋणी आहे.

**कु. जयश्री सर्जेराव पाटील**

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.